भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र.२०८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०३/०५/२०१७

**१) ट्रकमध्ये बिना परवाना रेती भरुन चोरी करुन निष्काळजीपणे चालवितांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :-**

दिनांक ३०/०४/२०१७ चे २२.४० वा. दरम्यान यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील ट्रकमध्ये मालकांच्या सांगण्यावरुन ट्रकमध्ये रेती घाटातील बिना परवाना ०४ ब्रास रेती किंमती ८,०००/-रु. ची चोरी करुन घेवुन जात असतांना व चालक याने ट्रक दारु पिवुन दारुचे नशेत भरधाव वेगाने वेडेवाकडे चालवितांना मिळुन आल्याने चालक आरोपी यांचे वैद्यकिय परीक्षण रिपोर्ट व फिर्यादी अमोल राजेन्द्र रेवतकर वय २७ वर्ष, रा. गांधी चौक पवनी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३७९,२७९,१०९ भांदवि. सकलम १८५ मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कवळु पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहे. आरोपी अटक आहे.

**२) क्षुल्लक कारणावरुन भांडण करुन काठीने मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :-**

दिनांक ०१/०५/२०१७ चे ०७.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी नेपाल बाबुराव भुरे वय ५६ वर्ष, रा. शास्त्री वार्ड वरठी यांचे सोबत आरोपी क्र. १ ते ४ याने शेतात जाण्याचे रस्त्याचे कारणावरुन भांडण करुन काठीने डावे हातावर, पायावर, पाठीवर, उजव्या हातावर मारुन जखमी केल्याने फिर्यादीचे बयान व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ३२४,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. हलमारे पो.स्टे. वरठी हे करीत आहेत.

**३) अचानक प्रकृती बिघडल्याने औषधोपचारा दरम्यान महीलेचा मृत्यु. :-**

दिनांक ०१/०५/२०१७ चे ०२.५० वा दरम्यान यातील मृतक सौ. प्रतीभा विलास कांबळे वय २८ वर्ष, रा लवारी उमरी ही ८ महिण्याची गर्भवती असल्याने तिची अचानक प्रकृती बिघडल्याने तिला औषधोपचाराकरीता सा.रु भंडारा येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉक्टरी मेमो वरुन पोस्टे भंडारा येथे मर्ग कलम ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. बघेले यांचे रिपोर्ट वरून पोस्टेला कलम १७४ जाफौ. चा नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भजने पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहे

**४) वैनगंगा नदीचे पात्रात उडी मारुन बुडाल्याने महीलेचा मृत्यु . :-**

दिनांक ०२/०५/२०१७ चे १०.४५ वा दरम्यान यातील मृतक सौ. रुबीना आशीक मिर्झा वय २८ वर्ष रा. सिव्हील लाईन गोंदीया हनुमान मंदीराचे मागे ह.मु. झिंगर सार्वे रा. आमगाव (दिघोरी) ही वैनगंगा नदीचे पात्रात उडी मारुन नदीचे पाण्यात बुडुन मरण पावल्याने फिर्यादी अशीक रमजान बेग मिर्झा वय ३७ वर्ष, रा. सिव्हील लाईन गोंदीया यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनी. इंगोले पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहे

५) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक ०२/०५/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुन ८६ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०४ तीन सिटर वाहनांवरती ०८ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ७४ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र.९९८७३८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.